# Punyanagari

## Wind Energy capacity above 32,000 mw

**Date: 27/04/2017 | Edition: Mumbai | Page: 7 | Source: Bureau | Clip size (cm): W: 5 H: 10**

India Media Monitor

**Clip: 1 of 1**



### पवन ऊर्जा क्षमता ३२,००० मेगावॅटच्या पार

**नवी दिल्ली :** देशात पवन ऊर्जा उत्पादन क्षमतेने ३२,००० मेगावॅटचा आकडा पार केला आहे, असे पवन ऊर्जा टर्बाइन उत्पादकांची संस्था (आयडब्ल्यूटीएमए)ने बुधवारी येथे म्हटले आहे. तथापि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए)च्या मार्च २०१७ च्या मासिक रिपोर्टनुसार देशात पवन ऊर्जेची स्थापित क्षमता जवळपास २८,७०० मेगावॅट झाली आहे. हा आकडा आयडब्ल्यूटीएमएच्या अंदाजापेक्षा कमी आहे. संस्थेचे चेअरमन सर्वेशकुमार 'विंड एनर्जी इंडिया २०१७' संमेलनात बोलताना म्हणाले की, भारताची स्थापित पवन ऊर्जा क्षमता ३२,००० मेगावॅटच्या पार गेली आहे. त्याचबरोबर २०२२ पर्यंत ६०,००० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कमीत कमी ६,००० मेगावॅट प्रत्येक वर्षी जोडण्याची आवश्यकता आहे. मागील आर्थिक वर्षात ५४०० मेगावॅटच्या वाढीनंतर देशात पवन ऊर्जा उत्पादन क्षमता ३२,००० मेगावॅटला पार केले आहे.